


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २५८ ●बुधवार, दि. १७ डिसेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# शरद पवारांचा शहराध्यक्ष मैत्रीचा प्रस्ताव घेऊन अजित पवारांच्या भेटीला, आज मोठा निर्णय होणार?

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकीचं बिगूल वाजल्यानंतर पुण्यात दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या गोटात जोरदार हालचाली सुरु झाल्या आहेत. दोन्ही राष्ट्रवादींनी एकत्र निवडणूक लढवावी, असा मतप्रवाह दोन्ही पक्षांमध्ये आहे. विशेष म्हणजे आज मोठी घडामोड घडली. उपमुख्यमंत्री अजित पवार आज पिंपरी चिंचवडमध्ये महापालिका निवडणुकीसाठी इच्छुकांच्या मुलाखती घेत होते. यानंतर आज संध्याकाळी मोठी घडामोड घडली. पिंपरी चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष तुषार कामठे अजित पवार यांच्या भेटीला आले. दोन्ही राष्ट्रवादींनी एकत्र निवडणूक लढवावी, असा प्रस्ताव घेऊन ते अजित पवारांच्या भेटीला आले. त्यांनी अजित पवारांची

**● पुण्यात दोन्ही राष्ट्रवादींच्या गोटात मोठ्या हालचाली सुरु आहेत. विशेष म्हणजे शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे पिंपरी चिंचवड शहराचे अध्यक्ष तुषार कामठे हे मैत्रीचा प्रस्ताव घेऊन अजित पवारांच्या भेटीला आले. यामुळे पुण्यात दोन्ही राष्ट्रवादीच्या एकत्र येण्याच्या चर्चांना उधाण आलं आहे.**

भेट घेतल्यानंतर माध्यमांना देखील प्रतिक्रिया दिली.

**तुषार कामठे काय म्हणाले?**

महापालिका निवडणूक लढताना स्थानिक पातळीवर निर्णय घेण्याचे अधिकार आम्हाला दिले होते. त्यामध्ये जे शिव, शाहू, फुले, आंबेडकर विचारांचे पक्ष आहेत, जे भाजप विरोधात निवडणूक लढू शकतात, अशा संघटनांना आणि



पक्षांना सोबत घेऊन निवडणूक लढवावी, त्या मागणीला पुढे घेऊन निवडणूक लढवण्यासाठी आमच्या शहराचा जो प्रस्ताव होता तो घेऊन मी आज अजित दादांकडे आलो होतो. महानगरपालिका निवडणूक आपण सोबत लढली तर भ्रष्टाचारी भाजपला थांबवू शकतो हा आमचा प्रस्ताव मी दादांना दिला आहे, अशी माहिती तुषार कामठे यांनी दिली.


मला कोणाचाही निरोप नव्हता. प्रदेश पातळीवरून तसे काही आम्हाला आदेश नाहीत. स्थानिक पातळीवर तुम्हाला जो निर्णय घ्यायचा तो घ्या, असे आदेश आम्हाला दिलेले आहेत. देवेंद्र फडणवीस यांनी कालच घोषित केलं होतं की ते आणि राष्ट्रवादी सोबत लढणार नाहीत, म्हणून आम्ही महाविकास आघाडीच्या मार्फत प्रस्ताव घेऊन त्यांच्याकडे आलो होतो, अशी प्रतिक्रिया ▶ उर्वरित पान २ वर

# गेवराईतील नगरपालिका निवडणुकीतील राजकीय राडा....

## भाजपा नेते बाळराजे पवार यांना मध्यरात्री अटक

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई विधानसभा मतदारसंघात भविष्यामध्ये राजकीय संघर्ष कसा असेल याची नांदी आत्ताच झालेल्या नगरपालिका निवडणुकीत पाहाण्यास मिळाली. राजकीय राड्यामुळे गेवराई मतदारसंघातील राजकारण पुन्हा एकदा ढवळून निघाले आहे. मतदानाच्या दिवशी झालेल्या हाणामारी प्रकरणात भाजपाचे नेते तथा माजी आमदार लक्ष्मण पवार यांचे बंधू बाळराजे पवार यांना पोलिसांनी मध्यरात्री ताब्यात घेतले. न्यायालयाने त्यांना एक दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या घटनेने जिल्हाभरात एकच खळबळ




उडाली आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून गेवराईमध्ये तगडा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

गेवराई नगरपालिका मतदान प्रक्रिया दरम्यान २ डिसेंबर रोजी दुपारी शहरात राजकीय वाद विकोपाला गेला होता. दोन गट समोरासमोर आले होते. भाजपा आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या समर्थकांमध्ये मोठा राडा झाला होता. हाणामारी, दगडफेक, गाड्यांच्या काचा फोडणे, माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या खासगी सहाय्यकावर मारहाण केल्याचा आरोप या घटनेने गेवराईतील राजकारण तापले होते. या प्रकरणी पोलिसांनी स्वत:हून फिर्याद दाखल केली होती.

तब्बल पंधरा दिवसानंतर गेवराईच्या राड्या प्रकरणी पोलिसांनी भाजपाचे नेते बाळराजे पवार यांना मध्यरात्री ताब्यात घेतले. मात्र बाळराजे पवार हे स्वत:हून पोलिसांत हजर झाल्याचे सांगण्यात येत आहे. त्यांना अटक करण्यात आली असून गेवराईमध्ये कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

गेवराईतील राड्या प्रकरणी ५० जणांविरूद्ध गुन्हे दाखल आहेत. त्यातील काही आरोपींना ताब्यात घेऊन नोटीस बजावण्यात आली होती. तापासादरम्यान भाजपाचे नेते बाळराजे पवार यांच्यावरील आरोपांची व्याप्ती आणि गुन्ह्यातील कलमामध्ये वाढ झाल्याने पोलिसांनी पाऊल उचलले. या प्रकरणामुळे बीड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

गेवराई पवार आणि पंडित या दोन राजकीय घराण्यामधील संघर्ष फार जुना आहे. नगरपालिका निवडणुकीच्या माध्यमातून हा संघर्ष पुन्हा एकदा उफाळून आला आहे. यामुळे आगामी काळात गेवराईतील राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे.

# वृद्धावस्थेत सरकारचा आधार! ज्येष्ठ नागरिकांना मिळणार दरमहा 1500 रुपये निवृत्तीवेतन

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य सरकारने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाअंतर्गत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धावस्था निवृत्ती वेतन योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत दारिद्र्यरेषेखालील (BPL) कुटुंबातील ६५ वर्षे व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना केंद्र व राज्य सरकारच्या संयुक्त निधीतून दरमहा एकूण १,५०० रुपये निवृत्तीवेतन दिले जाते.

६५ ते ७९ वर्षे वयोगटातील लाभार्थ्यांना केंद्र सरकारकडून इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धावस्था निवृत्ती पेन्शन योजनेतून दरमहा २०० रुपये आणि राज्य सरकारकडून श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती पेन्शन योजनेतून दरमहा १,३०० रुपये मिळतात. त्यामुळे त्यांना एकूण दरमहा १,५०० रुपये निवृत्तीवेतन मिळणार




आहे. तर ८० वर्षे व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना केंद्र सरकारकडून दरमहा ५०० रुपये आणि राज्य सरकारकडून दरमहा १,००० रुपये मिळतात. अशा प्रकारे त्यांनाही दरमहा एकूण १,५०० रुपये निवृत्तीवेतन मिळणार आहे.

योजनेचा उद्देश- दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील ६५ वर्षे व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना आर्थिक आधार देऊन त्यांची उपजीविका सुरक्षित करणे. तसेच त्यांच्या रोजच्या गरजा व आरोग्यविषयक खर्च भागविण्यास मदत करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

योजनेचे फायदे- या योजनेंतर्गत ६५ वर्षे व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना दरमहा १५०० रुपयांचे आर्थिक मदत मिळते.

आवश्यक कागदपत्रे- अर्जदाराचे आधार कार्ड, पासपोर्ट आकाराचे छायाचित्र, ओळख पुरावा म्हणजे मतदार ओळखपत्र, वाहनचालक परवाना, निवासाचा पुरावा, ▶ उर्वरित पान २ वर

# जि.प., पंचायत समिती निवडणुका अनिश्चितच

**गेवराई । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या प्रतीक्षेत असलेल्या गेवराई तालुक्यातील इच्छुक उमेदवारांना पुन्हा एकदा प्रतीक्षेचा धक्का बसला आहे. राज्य निवडणूक आयोगाने मंगळवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत आगामी काळात प्रथम महानगरपालिका निवडणुका घेण्यात येतील, त्यानंतरच जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांचा विचार केला जाईल, असे स्पष्ट संकेत दिले. आयोगाकडून महानगरपालिका निवडणुकांचा सविस्तर कार्यक्रम



जाहीर झाल्याने ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणखी काही काळ लांबणीवर जाणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे. या घोषणेचा थेट परिणाम गेवराई तालुक्यातील राजकीय वातावरणावर उमटताना दिसत आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी गुडघ्याला ▶ उर्वरित पान २ वर

# नगर रोड-राजीव गांधी चौकातील अतिक्रमण हटवले

## बीड शहर वाहतूक पोलिस व न.प. कर्मचाऱ्यांची संयुक्त कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर नगर रोड व राजीव गांधी चौक परिसरात वाहतुकीस अडथळा ठरणारी अतिक्रमणे हटविण्यात आली. बीड शहर वाहतूक पोलीस आणि नगरपालिका कर्मचाऱ्यांनी संयुक्तपणे ही कारवाई केली.

बीड शहरातील मुख्य व अंतर्गत रस्त्यांवर दिवसेंदिवस वाढणाऱ्या अतिक्रमणामुळे वाहतूक समस्या गंभीर



बनली होती. विशेषतः नगर रोडवर शासकीय कार्यालये असल्याने नेहमीच मोठी वर्दळ असते. मात्र या रस्त्यावर दुकानांच्या पाट्या, होल्डिंग, खुर्च्या तसेच इतर साहित्य रस्त्यावर ठेवल्यामुळे वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. तसेच जुना नगर नाका ते राजीव गांधी चौक दरम्यान भाजीपाला विक्रेते, वडापाव गाडे व इतर फेरीवाल्यांनी रस्त्यालगत अतिक्रमण केल्याने ▶ उर्वरित पान २ वर

### पाटोद्यातील अंगणवाड्यांची अवस्था बिकट;

# भाड्याच्या खोल्यांत कोंडले जाताहेत चिमुकले



**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा शहरातील अंगणवाड्यांची अवस्था अत्यंत दयनीय बनली असून जागेअभावी अनेक अंगणवाड्या भाड्याच्या खोल्यांमध्ये भरवाव्या लागत आहेत. या खोल्यांमध्ये पुरेशी जागा नसल्याने लहान लेकरांना थेट जमिनीवर बसवावे लागत असून काही ठिकाणी अंगणवाडी बाहेरच्या पटांगणात भरवली जात असल्याचे चित्र आहे. अंगणवाड्यांमध्ये आवश्यक असलेली स्वच्छता, सुरक्षितता व बालकांसाठी अनुकूल वातावरण याचा पूर्णपणे अभाव दिसून येतो. बोडारवरही स्वच्छतेचा अभाव असून परिसर अस्वच्छ अवस्थेत आहे. पावसाळा असो वा उन्हाळा, चिमुकल्यांच्या आरोग्याचा विचार न करता अंगणवाड्या कशाबशा सुरू आहेत. या गंभीर समस्येकडे नगरपंचायत आणि संबंधित नगरसेवक जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. काही नगरसेवक गुत्तेदारी व इतर स्वार्थी प्रश्नांत अडकले असून जनतेच्या विकासाकडे त्यांचे लक्ष नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया पालक व नागरिक व्ये करत आहेत. निवडणुकीच्या वेळी जनतेचे पाय धरून मते ▶ उर्वरित पान २ वर

# वडवणी तहसील कार्यालय अधिकाऱ्यांची दांडी यात्रा

## वडवणीचे अधिकारी फुल पगारी दंगल पेटली की चाले घरी

**वडवणी । प्रतिनिधी**

तालुक्याच्या कारभाराचे केंद्र असलेल्या तहसील कार्यालय वडवणी येथे आज सकाळी प्रशासनाचा ढिसाळ आणि बेजबाबदार चेहरा उघड झाला. सकाळचे साडेदहा वाजूनही एकही जबाबदार अधिकारी किंवा कर्मचारी कामावर हजर नसल्याने संपूर्ण कार्यालयात शुकशुकाट पसरला होता. टेबल-खुर्च्या रिकाम्या, फाईली धुळ खात पडलेल्या आणि कामकाज पूर्णतः ठप्प - हे चित्र पाहून नागरिक संतप्त झाले.

शासनाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी, उत्पन्न-जात प्रमाणपत्र, शिधापत्रिका, पेन्शन, नैसर्गिक आपत्ती मदत, जमिनीचे प्रश्न यासाठी गोरगरीब, शेतकरी, महिला, ज्येष्ठ



नागरिक दूरदूरच्या गावांतून येतात. मात्र येथे पोहोचल्यावर त्यांना मिळते ते फक्त फेऱ्या, वेळेचा अपव्यय आणि अपमानास्पद वागणूक. अधिकाऱ्यांची वेळ मात्र जनतेपेक्षा मौल्यवान आहे का, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. नियम, वेळ आणि शिस्त फक्त सामान्य नागरिकांसाठीच आहेत का?

कार्यालयीन वेळ सकाळी स्पष्टपणे ठरवलेली असताना अधिकाऱ्यांची ही दांडी यात्रा कोणाच्या मर्जीने सुरू आहे? वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नियंत्रण आहे की नाही, असा प्रश्नही यानिमित्ताने उपस्थित ▶ उर्वरित पान २ वर

**● अन्यथा रस्त्यावर उतरू**

**या गंभीर प्रकाराकडे जिल्हाधिकारी व महसूल विभागाने तात्काळ दखल घेऊन जबाबदार अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अन्यथा नागरिक रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडतील, असा इशारा देण्यात आला आहे. जनतेचा संयम आता संपत चालला असून प्रशासनाने वेळीच जागे न झाल्यास त्याची जबाबदारी पूर्णतः शासनाची असेल.**






# महिला डॉक्टरचा हिजाब काढण्याचा प्रकार...

## मानवी मूलभूत हक्कांवर गंभीर आघात

भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश असून, येथील राज्यघटना प्रत्येक नागरिकाला समानता, स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठेने जगण्याचा अधिकार देते. धर्म, लिंग, जात किंवा वेशभूषा यावरून कोणताही भेदभाव न करण्याची हमी राज्यघटनेत स्पष्टपणे नमूद आहे. मात्र अलीकडेच बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या उपस्थितीत एका महिला डॉक्टरला सार्वजनिक कार्यक्रमात हिजाब काढण्यास सांगितल्याची घटना समोर आली असून, या प्रकाराने मानवी मूलभूत हक्कांवर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. हिजाब हा केवळ कपड्याचा तुकडा नाही. अनेक मुस्लिम महिलांसाठी तो त्यांच्या धार्मिक आस्थेचा, सांस्कृतिक ओळखीचा आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा अविभाज्य भाग आहे. एखाद्या महिलेला तिच्या इच्छेविरुद्ध हिजाब काढण्यास सांगणे म्हणजे तिच्या धर्मस्वातंत्र्यावर (कलम २५), अभिव्यक्तीस्वातंत्र्यावर (कलम १९) आणि सन्मानाने जगण्याच्या अधिकारावर (कलम २१) थेट आघात होय. लोकशाही व्यवस्थेत अशी सक्ती स्वीकारार्ह ठरू शकत



नाही. विशेष म्हणजे संबंधित महिला डॉक्टर ही समाजाची सेवा करणारी एक व्यावसायिक आहे. तिची ओळख तिच्या ज्ञानामुळे, कर्तृत्वामुळे आणि सेवेच्या भावनेमुळे असायला हवी होती; मात्र तिच्या वेशभूषेवर लक्ष केंद्रित करून तिच्या वैयक्तिक श्रद्धेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. हे केवळ त्या एका महिलेसाठी अपमानास्पद नाही, तर संपूर्ण महिला वर्ग आणि अल्पसंख्याक समाजासाठी चिंताजनक आहे.

राजकीय नेतृत्व हे समाजासाठी आदर्श असते. मुख्यमंत्रीपदासारख्या घटनात्मक पदावर असलेल्या व्यक्तीकडून संवेदनशीलता, संयम आणि घटनात्मक मूल्यांची जपणूक अपेक्षित असते. परंतु अशा प्रकारची वर्तणूक सत्तेच्या अहंकाराचे आणि स्त्रीविषयक असंवेदनशीलतेचे दर्शन घडवते. एकीकडे महिलांच्या सक्षमीकरणाच्या घोषणा दिल्या जातात, तर दुसरीकडे महिलांना त्यांच्या पोशाखावरून सार्वजनिकरीत्या लज्जास्पद स्थितीत आणले जाते – हा दुटप्पीपणा गंभीर आहे. या घटनेचे व्यापक सामाजिक परिणामही आहेत. अशा प्रकारांमुळे अल्पसंख्याक समाजात असुरक्षिततेची भावना वाढते. राज्यकर्तेच जर एखाद्या विशिष्ट धार्मिक ओळखीला अप्रत्यक्षपणे नाकारत असतील, तर सामान्य नागरिकांमध्येही असहिष्णुता वाढण्याचा धोका निर्माण होतो. भारताची ओळख ही विविधतेतील एकतेची आहे; ती ओळख कमकुवत करण्याचे काम अशा घटनांमधून घडते.

मानवी हक्क हे कोणाच्या दयेवर अवलंबून नसतात; ते जन्मसिद्ध असतात. एखाद्या महिलेला काय घालायचे, काय न घालायचे, हे ठरवण्याचा अधिकार केवळ तिचाच आहे. राज्य, समाज किंवा राजकीय नेत्यांना तो अधिकार हिरावून घेण्याचा कोणताही नैतिक वा घटनात्मक अधिकार नाही. हिजाब काढण्याची सक्ती ही केवळ धार्मिक हस्तक्षेप नसून, स्त्रीच्या स्वायत्ततेवर केलेला हल्ला आहे. या प्रकरणावर मौन बाळगणे म्हणजे अशा अन्यायाला अप्रत्यक्ष पाठिंबा देण्यासारखे आहे. नागरिक समाज, माध्यमे आणि मानवाधिकार संघटनांनी अशा घटनांचा स्पष्ट निषेध करणे आवश्यक आहे. तसेच राजकीय नेतृत्वानेही आत्मपरीक्षण करून सार्वजनिक माफी मागणे आणि भविष्यात अशा घटना घडू नयेत याची जबाबदारी घेणे गरजेचे आहे.

आज देशासमोर उभा असलेला खरा प्रश्न हिजाबचा नसून, मानवी स्वातंत्र्याचा आहे. जर आज एका महिला डॉक्टरला तिच्या श्रद्धेवरून अपमान सहन करावा लागत असेल, तर उद्या कोणत्याही नागरिकाचे मूलभूत हक्क धोक्यात येऊ शकतात. त्यामुळे लोकशाही, संविधान आणि मानवी हक्कांचे रक्षण करणे ही काळाची गरज आहे. अन्यथा स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये केवळ पुस्तकांपुरतीच मर्यादित राहतील.

**– शबनम मुजीब खान**
**छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)**

# करबुडव्या 'सनबर्न फेस्टिव्हल'ला सरकारच्या पायघड्या कशासाठी?

गेल्या काही दिवसांत वृत्तपत्रांतील बातम्या वाचल्यावर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे प्रतिदिन कुठे ना कुठे अमली पदार्थाचा साठा पकडला जात आहे, अमली पदार्थाशी संबंधित रॅकेट्सचा पर्दाफाश होत आहे, अमली पदार्थाशी संबंधित गुन्हेगारांची धरपकड केली जात आहे. अमली पदार्थ विरोधी पथकाने मागील सहा महिन्यात राज्यात विविध ठिकाणी शेकडो कोटी रुपयांचे अमली पदार्थ नष्ट केले आहे. शौर्य, संस्कृती आणि अध्यात्माचा वारसा लाभलेल्या महाराष्ट्राला हळूहळू पडत चाललेला अमली पदार्थांचा विळखा तरुणाईचे भविष्य संकटात चालल्याचे संकेत देत आहे. महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी असलेले पुणे मागील ३-४ वर्षांमध्ये अमली पदार्थाचे नंदनवन बनले होते. मुंबई, ठाणे, पालघर, नवी मुंबई यांसारख्या शहरांतही अमली पदार्थांचे जाळे मोठ्या प्रमाणात विखुरलेले आहे. शाळा महाविद्यालयानजीक असलेल्या पानपट्ट्यांवर सुद्धा अमली पदार्थ मिळू लागले आहेत. राज्यातील अमली पदार्थाचे वाढते प्रस्थ लक्षात घेता राज्य सरकारने याविरोधात युद्ध पातळीवर कारवाई करणे गरजेचे असताना सरकारने अमली पदार्थांची सहज रेलचेल करणाऱ्या सनबर्न फेस्टिव्हलसाठी पायघड्या घालायला सुरुवात केली आहे. म्युझिकल शोच्या नावावर आयोजित केल्या जाणाऱ्या या कार्यक्रमात तरुणाईला नशेच्या आहारी जाण्यासाठी अनुकूल वातावरण तयार केले जाते. गोव्यानंतर पुणे आणि यंदा हा कार्यक्रम १९ ते २१ डिसेंबर या कालावधीत मुंबईतील शिवडी येथील पोर्ट ट्रस्टच्या जमिनीवर आयोजित करण्यात आला आहे. यासाठी सर्व प्रकारच्या सुविधा सरकारकडून करून देण्यात आल्या आहेत. हा कार्यक्रम संगिताशी संबंधित असला, तरी आजतागायत हा कार्यक्रम ज्या ज्या ठिकाणी साजरा झाला त्याठिकाणी विविध प्रकारची गुन्हेगारी कृत्येच उघडकीस आली आहेत शिवाय या कार्यक्रमाच्या आयोजकांनी सरकारचा कोट्यवधी रुपयांचा करसुद्धा बुडवला आहे, असे असताना सरकार या कार्यक्रमासाठी एव्हढा पुढाकार का घेत आहे ही न कळणारी बाब आहे.

फेस्टिव्हल दरम्यान स्त्रियांच्या छोडछाडीचे प्रसंग सातत्याने घडत असतात. संगीताला भारतीय संस्कृतीने नेहमीच आदराचे स्थान दिले आहे. भारतीय संगीताकडे ईश्वरप्राप्तीचा एक मार्ग म्हणून पाहिले जाते. भारतीय संगीताचा गवगवा साऱ्या जगात असताना आणि संगीत साधना करून त्यामध्ये प्राविण्य मिळवणारे गायक, संगीतकार आणि गीतकार आज भारतात तालुक्या तालुक्याला असताना भोगवादाला खतपाणी देणारे सनबर्न फेस्टिव्हलसारखे इलेक्ट्रॉनिक डान्स म्युझिक महोत्सव भारतात हवेत तरी कशाला ? स्त्री अत्याचारांच्या घटनांमध्ये महाराष्ट्राने याआधीच पहिला क्रमांक पटकावला आहे. राज्यात पसरत चाललेले अमली पदार्थांचे जाळे पाहता छत्रपती शिवरायांचा वारसा सांगणाऱ्या महाराष्ट्राची वाटचाल उडता पंजाबच्या दिशेने होत आहे की काय असेही भय आता वाटू लागले आहे. अश्लीलता आणि नशेखोरीला प्रोत्साहन देणाऱ्या सनबर्न फेस्टिव्हलचे राज्याच्या राजधानी मुंबईत आयोजन करण्यास परवानगी आणि सुविधा देणाऱ्या सरकारला महाराष्ट्राला नक्की कुठे घेऊन जायचे आहे ? मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या सनबर्न फेस्टिव्हलच्या विरोधात 'नशा विरोधी संघर्ष अभियान'ने व्यापक आंदोलन छेडले आहे. ज्याला राज्यभरातील युवावर्गाकडून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. 'सनबर्न फेस्टिव्हल' मुंबईतून हद्दपार करण्याची मागणी सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात केली जात आहे. छत्रपती शिवरायांच्या विचारांचा वारसा सांगणारे राज्यातील महायुती सरकार सनबर्न फेस्टिव्हलच्या संदर्भात काय निर्णय घेते हे पाहणे आता महत्वाचे ठरणार आहे !

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

◆ पान १ वरून पुढे...

### शरद पवारांचा...

तुषार कामठे यांनी दिली.दरम्यान, अजित पवार यांनी उमेदवारांच्या बैठका घेतल्यानंतर ते आज रात्री मुंबईत दाखल होत आहेत. अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली उद्या दुपारनंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची महत्त्वाची बैठक पार पडणार आहे. या बैठकीला प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि खासदार प्रफुल्ल पटेल उपस्थित राहणार आहेत. या तीनही नेत्यांमध्ये पुण्यात शरद पवारांच्या पक्षासोबत युती करायची का? याबाबत चर्चा होणार आहे. राष्ट्रवादीची बैठक संपल्यानंतर शरद पवार यांच्या राष्ट्रवादीसोबत युती संदर्भात महत्त्वाचा निर्णय होण्याची शक्यता आहे. या बैठकीतील निर्णयानंतर ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या राष्ट्रवादीसोबत चर्चा केली जाणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

### वृद्धावस्थेत सरकारचा...

वयाचा पुरावा, दारिद्र्य रेषेखालील (बी. पी. एल.) कार्ड/संबंधित कागदपत्रे, जात प्रमाणपत्र, लागू असल्यास, पत्त्याचा पुरावा, बँक पासबुक/बँक खात्याचा तपशील, आवश्यक असल्यास इतर कागदपत्रे योजनेच्या पात्रता व अटी- अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी असावा. अर्जदाराचे वय ६५ वर्षे किंवा त्याहून अधिक असावे. अर्जदार दारिद्र्य रेषेखालील (बी. पी. एल.) कुटुंबातील असावा. अर्जदाराला कोणत्याही सामाजिक सुरक्षा योजनेअंतर्गत निवृत्तीवेतनाचा लाभ मिळत नसावा. अर्ज प्रक्रिया- अर्जदाराने संबंधित कार्यालयातून जिल्हा सामाजिक न्याय कार्यालय किंवा तालुका कार्यालयातून अर्जाचा विहित नमुना घ्यावा. अर्ज अचूक माहितीने भरावा. आवश्यक कागदपत्रे व छायाचित्र जोडावे. स्वाक्षरीसह अर्ज सादर करावा. त्यानंतरअर्ज स्वीकारल्याची पावती घ्यावी.

### जि.प.,पंचायत...

बाशिंग बांधून मैदानात उतरलेले अनेक इच्छुक उमेदवार निराश झाले आहेत. गेल्या काही महिन्यांपासून संभाव्य उमेदवारांनी आपापल्या सर्कल व गणांमध्ये जोरदार जनसंपर्क सुरू केला होता. गावोगावी बैठका, कार्यकर्त्यांच्या भेटी, सामाजिक कार्यक्रमांमधील उपस्थिती, मतदारांशी थेट संवाद यावर भर दिला जात होता. मात्र निवडणूक कार्यक्रम लांबणीवर गेल्याने या हालचालींना काहीसा ब्रेक लागण्याची शक्यता आहे. गेवराई तालुक्यात एकूण ९ सर्कल व १८ गण असून, प्रत्येक ठिकाणी इच्छुकांची संख्या लक्षणीय आहे. काही सर्कलमध्ये तर उमेदवारीसाठी स्पर्धा चांगलीच रंगली होती. संभाव्य उमेदवारांची नावे चर्चेत होती; पक्षांतर्गत हालचालींना वेग आला होता, तर काही इच्छुकांनी अपक्ष लढतीचीही चाचपणी सुरू केली होती. मात्र आता सर्वांच्याच मनात एकच प्रश्न घोळत आहे – निवडणूक नेमकी कधी? राजकीय जाणकारांच्या मते, महानगरपालिका निवडणुका पार पडल्यानंतरच राज्य निवडणूक आयोग ग्रामीण भागातील निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्याची शक्यता आहे. त्यामुळे

◆ पान १ वरून पुढे...

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी अजून काही महिने प्रतीक्षा करावी लागू शकते. या काळात इच्छुक उमेदवारांना संयम राखत संघटन मजबूत करणे, जनसंपर्क टिकवून ठेवणे आणि स्थानिक प्रश्नांवर सक्रिय राहणे, हाच मार्ग उरला आहे दरम्यान, निवडणुका लांबणीवर गेल्याने स्थानिक विकासकामे, प्रशासकीय निर्णय व जनतेच्या प्रश्नांवरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे ग्रामीण भागातून निवडणूक कार्यक्रम लवकर जाहीर करावा, अशी मागणी हळूहळू जोर धरू लागली आहे.

### नगर रोड-राजीव...

वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींची दखल घेत आज बीड शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक सानप व बीड नगरपालिका कर्मचाऱ्यांनी संयुक्त कारवाई करत नगर रोड व राजीव गांधी चौक परिसरातील अतिक्रमणे हटवली. या कारवाईमुळे संबंधित रस्ता मोकळा झाला असून नागरिक व वाहनचालकांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे. ही कारवाई जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी सुभाष सानप, पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, पोलीस हवालदार राहुल गायकवाड,पोलीस अंमलदार वसीम शेख, विनायक गाडे, मोहन बनसोडे पोलीस ड्रायव्हर चालक नारायण वाघमारे पोलीस हवलदार चालक संतोष हारके अतिक्रमण पथक प्रमुख मुन्ना गायकवाड यांच्यासह पवन लाहोट, सुजित जाधव, लखन तुसांबड, किरण भिसे, अविनाश डूलगच व विकी गगाट यांनी केली. भविष्यात पुन्हा अतिक्रमण आढळल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही पोलीस निरीक्षक सानप व नगरपालिका कर्मचाऱ्यांनी अतिक्रमणधारकांना दिला आहे.

### भाड्याच्या खोल्यांत ...

मागणारे लोकप्रतिनिधी निवडून आल्यानंतर मात्र जनतेकडे डोळे उघडून पाहायलाही तयार नसल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली आहे.लहान मुलांचे भवितव्य धोक्यात असताना नगरपंचायत कोणतीही ठोस भूमिका घेत नसल्यामुळे संताप वाढत आहे. शहरातील सर्व अंगणवाड्यांसाठी कायमस्वरूपी, सुरक्षित व प्रशस्त इमारती तातडीने उपलब्ध करून द्याव्यात अशी जोरदार मागणी पालक व सामाजिक कार्यकत्यारकडून होत आहे. अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

### वडवणी तहसील...

झाला आहे. तहसील कार्यालय म्हणजे जनतेसाठी न्याय आणि मदतीचे केंद्र; मात्र वडवणीत हेच कार्यालय जनतेसाठी छळछावणी बनत चालल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. याआधीही कामकाजाबाबत अनेक तक्रारी करूनही प्रशासनाने डोळेझाक केल्याने अधिकाऱ्यांचे मनोबल वाढले असून ते खुलेआम नियम धाब्यावर बसवत आहेत.

◆ पान ४ वरून पुढे...

### शंभर दिडशे....

यांचे या भागासाठी प्रत्यक्ष योगदान काय आहे. असा प्रश्न नागरिकांसमोर आहे. आरोप, जातीयतेढ निर्माण करणे आणि खोट्या श्रेयवादापुरतेच राजकारण मर्यादित असल्याची चर्चा प्रभागात सुरू आहे. अमरधाम परिसरातील दयनीय अवस्था पाहून स्वखर्चाने कामे करणारे अमृत काका असताना निधी चोरीचे आरोप करणे जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न असल्याचे स्पष्ट होते. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे दलित वस्ती निधीच्या वापराबाबत आधीच उपस्थित प्रश्न, टक्केवारीच्या लालसेमुळे विकास कुठे अडवला गेला हे नागरिक विसरलेले नाहीत. सूर्याभोवती कितीही काळे ढग असले तरी सूर्याचा प्रकाश लपवता येत नाही, तसेच अमृत काकांच्या समाजोपयोगी कार्याचा प्रभाव कोणतेही खोटे आरोप कमी करू शकत नाही. अठरापगड जातींना सोबत घेऊन चालणारा समावेशक चेहरा म्हणून अमृत काका सारडा यांची ओळख आहे. असल्याचे निलेश लोंढे, महेश कसबे यांनी म्हटले आहे. १००-१५० रुपयांत समाजाची लायकी ठरवणाऱ्या जातीय मानसिकतेला येत्या २० तारखेला मतदानातून चोख उत्तर देण्याचा निर्धार प्रभाग क्रमांक तीनमधील नागरिकांनी व्यक्त केला आहे.

### बीडमध्ये थरार...

दरम्यान, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला त्यांचा संशय आला आणि पोलिसांनी त्यांचा पाठलाग सुरू केला. यातील दोघांना पोलिसांनी जागीच पकडले, तर उर्वरित दोघांना मस्साजोगपर्यंत पाठलाग करून ताब्यात घेतले. त्यांना सामान्य लोकांनीही मदत केली. पोलिसांनी त्यांच्याकडून दोन चोरीच्या दुचाकी, मोबाइल असा एकूण अडीच लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या टोळीला अटक केल्याने या परिसरातील अनेक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. या पथकाने केली कामगिरी- एलसीबीचे पोलिस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, उपनिरीक्षक महेश विघ्ने, बप्पासाहेब घोडके, राजू पठाण, महेश जोगदंड, युनूस बागवान, भागवत शेलार, गणेश मराडे आदींनी केली. पोलिस अधीक्षक नवनीत काँवत, अपर अधीक्षक

◆ पान ४ वरून पुढे...

सचिन पांडकर यांनी त्यांना मार्गदर्शन केले. लग्नात लहान मुलेही करतात चोरी- लग्न समारंभात याच सिसोदिया गँगमध्ये मोठ्यांसोबत लहान मुलेही असतात. नवरीच्या खोलीत अथवा गर्दीचा फायदा घेऊन महिलांच्या पर्स चोरी करण्याचे काम ही लहान मुले करतात. यापूर्वी बीड, आष्टीमध्ये असेच प्रकार घडले होते. तसेच छत्रपती संभाजीनगर पोलिसांनीही अशा प्रकारची टोळी पकडली होती. आता बीड पोलिसांनीही ही टोळी पकडली आहे. त्यांच्या साथीदारांचा शोध सुरू आहे. नंदुरबारला चोरी करून बीडमध्ये प्रवेश- नंदुरबार जिल्ह्यात याच टोळीने बॅग लिफ्टिंग केली होती. तेच पैसे घेऊन हे चोरटे बीड जिल्ह्यात आले होते. केजमध्ये एका बँकेत त्यांनी लुटण्याचा प्रयत्न केला, परंतु यश आले नाही. त्यामुळे ते बीड शहरात येत होते. परंतु त्या आधीच त्यांना मस्साजोगजवळ पोलिसांनी बेड्या ठोकल्या.

### कडाक्याच्या थंडीने...

आहेत. थंडीची पर्वा न करता ऊसतोड कामगारांना ऊसतोड करावी लागत आहे. थंडीमुळे बाजारपेठेवर अंशतः परिणाम झाला आहे. संध्याकाळी सात-आठच्या पुढे बाजारपेठेत शुकशुकाट दिसून येत आहे. तसेच आठवडे बाजाराच्या दिवशी थंडीपासून संरक्षण मिळण्यासाठी स्वेटर, स्कार्फ, जर्किन, ब्लॅकेट खरेदी करण्यासाठी लोकांची गर्दी होत आहे. थंडीपासून दिलासा मिळण्यासाठी शेकोटी पेटताना दिसत आहेत.

### अ‍ॅड. मंगेश ससाणे...

यांच्यावर दोन महिण्यांपूर्वी झालेल्या हल्याची कारवाईस दिरंगाई होत असल्याने चौकशीसाठी माजलगाव ग्रामीण पोलिस स्टेशन येथे भेटून माजलगाव मार्गे धारूर ला जात असतांना धारूर घाटामध्ये काही समाजकंटकांनी त्यांच्यावर दगडफेक करत प्राणघातक हल्ला केला. त्यामुळे या प्रकरणातील आरोपींवर कारवाई करण्यात यावी अन्यथा त्यांचा निषेध म्हणून सकल ओबीसी समाज माजलगावच्या वतीने तिव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

### पर्यावरण संवर्धनासाठी...

गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा.विनोद किर्दक प्रा.श्रीमती कल्पना घारगे,ग्रंथपाल प्रा.ज्योती रकटे ,कनिष्ठ विभागाचे प्रमुख प्रा.सतिश जरांगे प्रा.बाळासाहेब जोशी यांची उपस्थिती होती.प्रस्ताविक ग्रंथपाल प्रा.श्रीमती ज्योती रकटे यांनी केले.उदघाटक प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी उदघाटनपर भाषणात सांगितले की आज प्रदुषण ही गंभीर समस्या निर्माण झाली आहे.त्यामुळे पर्यावरण धोक्यात आले आहे.यासाठी डिजीटल ग्रंथालयाच्या माध्यमातुन पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठीच या कार्यशाळेचे आयोजन केले आहे.तरी युवकांनी भविष्यातील पर्यावरणाच्या संवर्धनासाठी सज्ज राहावे असे अहवान केले.या प्रसंगी प्रा.विनोद किर्दक व प्रा. डॉ.सुनिल जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले.प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा.डॉ.अशोक देवगुडे यांनी करून दिला.या कार्यशाळेचे सुत्रसंचालन प्रा.डॉ.बंडू लोखंडे यांनी केले तर आभार वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रा.बाळासाहेब जोशी यांनी केले.या कार्यशाळेस सर्व प्राध्यापक वृंद,व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

### भरधाव वाहनाची..

धाराशिवच्या दिशेने निघाला होता. तो मांजरसुंबा घाटातील एका वळणावर आला असता, समोरून येणाऱ्या एका अज्ञात वाहनाने त्याच्या दुचाकीला समोरासमोर भीषण धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की, धडक बसल्यानंतर दुचाकीचा पुढचा भाग पूर्णपणे चक्काचूर झाला. चैतन्य याला गंभीर दुखापत झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. रात्रीची वेळ असल्याने आणि घाटात अंधार असल्याने सुरुवातीला अपघात नेमका कशामुळे झाला हे समजले नाही, मात्र धडकेचा आवाज ऐकून आजूबाजूच्या नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. अपघाताची माहिती मिळताच महामार्ग पोलीस केंद्राचे सहाय्यक पोलीस निरीक्षक (सपोनि) बालाजी ढगारे यांनी आपल्या पथकासह तातडीने घटनास्थळी धाव घेतली. अपघातामुळे महामार्गाच्या दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच

◆ पान ४ वरून पुढे...

लांब रांगा लागल्या होत्या आणि मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. पोलिसांनी अपघातग्रस्त वाहन बाजूला सारून आणि पंचनामा करून वाहतूक सुरळीत केली. मृत चैतन्य तांबोळकर हा त्याच्या आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा होता. त्याच्या अपघाती निधनाचे वृत्त समजताच पाचपिंपळा गावावर शोककळा पसरली आहे. तरुणाचा असा दुर्दैवी अंत झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. धडक देऊन पळून गेलेल्या अज्ञात वाहनचालकाचा शोध पोलीस घेत आहेत. या प्रकरणी ग्रामीण पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात आली आहे अधिक तपास पोलीस करत आहेत.

### प्रशासकीय अभ्यासातून...

सवलतीनुसार स्वतःच्या गावात राहून हा अत्यंत महत्त्वपूर्ण अभ्यासक्रम पूर्ण केला. त्यांच्या या जिद्दीमुळे, प्रशासकीय सेवांमध्ये कार्यरत होणाऱ्या इतर अधिकाऱ्यांसाठी त्यांनी नवा आदर्श निर्माण केला आहे. विकासासाठी ठोस शिफारसी: आपल्या अहवालाच्या निष्कर्षात श्री रविंद्र दिलीप कानाडे. यांनी गावातील समस्यांवर मात करण्यासाठी खालीलप्रमाणे कृती योजना आणि शिफारसी सादर केल्या आहेत:जलयुक्त शिवार योजना: गावात पाण्याचे स्रोत वाढवण्यासाठी तातडीने जलयुक्त शिवार किंवा अन्य जलसंधारणाच्या कामांवर लक्ष केंद्रित करणे. स्थानिक रोजगार निर्मिती: बेरोजगार तरुणांसाठी शासनाच्या 'कौशल्य विकास मिशन' अंतर्गत कृषी आधारित लघुउद्योगांचे प्रशिक्षण सुरू करणे. योजनांचा प्रभावी लाभ: ग्रामसेवकांनी दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांपर्यंत थेट जाऊन सरकारी योजनांचा शंभर टक्के लाभ पोहोचेल, याची खात्री करणे.आरोग्य सुधारणा: आरोग्य उपकेंद्रात महिन्यातून किमान दोनदा एमबीबीएस डॉक्टरांचा व्हिजिटिंग कॅम्प आयोजित करणे. श्री. रवींद्र दिलीपराव कानाडे यांचा हा अहवाल बीड जिल्हा प्रशासनाला ग्रामीण विकासाची धोरणे अधिक प्रभावीपणे राबवण्यासाठी निश्चितच उपयुक्त ठरणार आहे, असे मत प्रशासनाच्या वतीने व्यक्त करण्यात आले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# मालवण खुल्या समुद्र जलतरण स्पर्धेत बीडच्या दिव्यांग व इतर जलतरणपटूंची उल्लेखनीय कामगिरी



**बीड । प्रतिनिधी**

सिंधुदुर्ग जलतरण संघटना व महाराष्ट्र जलतरण संघटना यांच्या संयुक्त विद्यमानाने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण येथे दिनांक १३ व १४ डिसेंबर रोजी भव्य अशा खुल्या समुद्री जलतरण स्पर्धा उत्साहात पार पडल्या. या राज्यस्तरीय स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील नामांकित जलतरणपटूंनी सहभाग नोंदवला होता.

या स्पर्धेत बीड जिल्ह्यातील जलतरणपटूंनी उल्लेखनीय कामगिरी करत जिल्ह्याचा नावलौकिक वाढवला. विशेष म्हणजे या स्पर्धेत बीड जिल्ह्यातील दिव्यांग जलतरणपटू आभा गणेश मुंडे व स्वरा लक्ष्मीकांत चाटे यांनी अत्यंत प्रेरणादायी कामगिरी केली. एक किलोमीटर खुल्या समुद्री जलतरण स्पर्धेत आभा गणेश मुंडे हिने उत्कृष्ट जलतरण कौशल्य सादर करत दुसरा क्रमांक पटकावला, तर स्वरा लक्ष्मीकांत चाटे हिने तिसरा क्रमांक मिळवून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. विशेष बाब म्हणजे स्वरा चाटे हिची ही स्विमिंग शिकल्यापासूनची पहिलीच स्पर्धा असून पहिल्याच स्पर्धेत तिने स्वतःची गुणवत्ता सिद्ध केली. समुद्रातील प्रतिकूल लाटा व आव्हानात्मक परिस्थितीवर मात करत या दोन्ही दिव्यांग जलतरणपटूंनी दाखवलेली जिद्द व आत्मविश्वास उपस्थित प्रेक्षक व प्रशिक्षकांचे विशेष कौतुकास पात्र ठरले.

दोन किलोमीटर फिन्स जलतरण स्पर्धेत समीक्षा वैजनाथ वेरूळे हिने पाचवा क्रमांक, तर राजनंदनी प्रकाश चाटे हिने सहावा क्रमांक पटकावून आपली क्षमता सिद्ध केली. तसेच दोन किलोमीटर खुल्या जलतरण स्पर्धेत आर्या वैजनाथ वेरूळे हिला ३६ वा क्रमांक, तर सिद्धी लक्ष्मीकांत चाटे हिला ३८ वा क्रमांक प्राप्त झाला.

या स्पर्धेत बीड जिल्ह्यातून एकूण सहा मुलींनी सहभाग नोंदवला होता. मर्यादित साधनसंपत्ती असूनही या सर्व जलतरणपटूंनी दाखवलेली मेहनत, चिकाटी आणि क्रीडास्पृहाच बीड जिल्ह्यातील क्रीडा संस्कृतीसाठी अभिमानास्पद बाब ठरली आहे. या यशाबद्दल सर्व जलतरणपटूंचे पालक, प्रशिक्षक व क्रीडाप्रेमींनी अभिनंदन केले असून, भविष्यात या खेळाडूंनी राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी करावी अशा शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

## १८ डिसेंबरला अल्पसंख्यांक हक्क दिवसानिमित्त कार्यक्रम

**धाराशिव । प्रतिनिधी**

अल्पसंख्यांक समाजातील नागरिकांना त्यांची संस्कृती, भाषा,धर्म व परंपरा इत्यादीचे संवर्धन करता यावे यासाठी दरवर्षी १८ डिसेंबर हा दिवस अल्पसंख्यांक हक्क दिवस म्हणून साजरा करण्यात येतो.या दिवसाचे औचित्य साधून जिल्हा नियोजन समिती धाराशिव यांच्याकडून १८ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा नियोजन समिती कार्यालय धाराशिव येथे अल्पसंख्यांक समाजातील नागरिकांना त्यांच्या घटनात्मक आणि कायदेशीर हक्कांबाबत आयोजित कार्यक्रमातून जाणीव जागृती करण्यात येणार आहे. तरी अल्पसंख्यांक समाजातील नागरिकांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे.असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी पुंडलिक गोडसे यांनी केले आहे.

## दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त सरपंच परिवंत गायकवाड यांच्या कडून विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**आष्टी । प्रतिनिधी**

गोरगरीब कष्टकरी दिनदलित शेतकरी ऊसतोड कामगार यांच्या हक्कासाठी शेवटच्या श्वासापर्यंत ज्यांनी लढा दिला तसेच शेठजी भटजी चा पक्ष अशी ओळख असलेल्या भारतीय जनता पार्टीला सर्व सामान्यांच्या पक्ष अशी ओळख ज्या नेत्यांनी केली असे दिवंगत लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या ७६ व्या जयंती निमित्त कऱ्हेवडगांवचे सरपंच




परिवंत गायकवाड यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश टकले, उपाध्यक्ष महेश सांगळे, मुख्याध्यापक पवार सर, सहशिक्षक वाघमारे सर, सहशिक्षीका पवार मॅडम, शरद खांडवे, मुकादम आत्माराम नागरगोजे, बळीराम खांडवे, कांतीलाल सांगळे, राम नागरगोजे , मेजर संतोष टकले, उत्तम नागरगोजे,हनुमान गायकवाड,शरद खांडवे, उध्दव खांडवे,अमर शेख, हरिदास टकले, रामराव खांडवे, कृष्णा जाधव,आदी उपस्थित होते.

## परभणी व हिंगोली जिल्ह्यात राष्ट्रीय लोक अदालतीत ३,८१३ प्रकरणे निकाली ; १६ कोटींहून अधिक रकमेची वसुली

**परभणी । प्रतिनिधी**

परभणी व हिंगोली जिल्ह्यात शनिवारी (दि. १३) रोजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, परभणी यांच्या वतीने राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या लोक अदालतीत एकूण ३ हजार ८१३ तडजोडपात्र प्रकरणे निकाली काढण्यात आली असून त्यातून १६ कोटी २१ हजार ८७१ इतक्या रकमेची वसुली करण्यात आली. राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये सर्व प्रकारची तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, भारतीय चलनक्षम दस्तऐवज अधिनियम १८८१ अंतर्गत प्रकरणे, बँक वसूली, मोटार अपघात दावे, कौटुंबिक वाद, कामगार विषयक, भू-संपादन, वीज (चोरी वगळून), पाणी आकार, वेतन व भत्ते, सेवा विषयक, महसूल तसेच इतर दिवाणी स्वरूपाची व वाद दाखलपूर्व प्रकरणे ठेवण्यात आली होती.

# जरूड' करांची हाक – 'आम्ही येतो; तुम्हीही या' शेतकरी हक्क मोर्चाच्या बैठकीस उत्स्फूर्त प्रतिसाद

**बीड । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या कापूस व सोयाबीन पिकांना रास्त हमीभाव मिळावा, या प्रमुख मागणीसाठी दिनांक २५ डिसेंबर २०२५ रोजी बीड येथे आयोजित करण्यात आलेल्या शेतकरी हक्क मोर्चा च्या जनजागृतीसाठी मौजे जरूड येथे शेतकरी बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीत उपस्थित शेतकऱ्यांनी जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना हाक देत, आम्ही



मोर्चासाठी येत आहोत, तुम्हीही या असे आवाहन केले. शेतकऱ्यांचा हा हक्काचा लढा अधिक व्यापक करून शेतकरी एकजूट दाखवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

बैठकीसाठी बीड येथून शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, माजी सैनिक अशोकराव येडे व सुहास जायभाय यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले. याला प्रतिसाद देत शेतकऱ्यांनी मोर्चात जास्तीत जास्त संख्येने सहभागी होण्याचा विश्वास दिला. या वेळी गणेश काकडे,रामकिसन काकडे, रामकिसन काकडे, ईश्वर काकडे, बाळू नाना काकडे ,गणेश काकडे, सुंदरराव काकडे ,प्रताप काकडे, कोंडीराम काकडे ,सचिन शहामाने, विशाल मुळे, विक्रम काकडे ,रंजीत काकडे, वशिष्ठ काकडे, सचिन काकडे ,विठ्ठल जाधव ,अशोक काकडे, राजेश काकडे, विलास काकडे, नंदकुमार काकडे, रामेश्वर काळे, कल्याण काकडे, ज्ञानोबा काकडे पुत्र, शेतकरी मित्र व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली महिला बालविकास विभागाने रोखला बाल विवाह

**नांदेड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात बाल विवाहाची कोणतीही माहिती मिळाल्यास तात्काळ शहरी भागातील बालविकास प्रकल्प अधिकारी तसेच ग्रामीण भागात ग्रामसेवक, अंगणवाडी सेवीका, चाईल्ड हेल्प लाईन १०९८ या टोल फ्री क्रमांक वर संपर्क साधावा. जेणे करुन भविष्यातील अनिष्ठ प्रथा रोखता येतील असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे. जिल्ह्यात बालविवाह मुक्त भारत १०० दिवस अभियान जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु



आहे. अर्धापुर तालुक्यात एका १७ वर्षीय बालिकेचा बालविवाह होणार असल्याबाबत गोपनीय माहिती चाईल्ड लाईन १०९८ ला प्राप्त झाली. ही तक्रार प्राप्त होताच जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय अंतर्गत जिल्हा बालसंरक्षण अधिकारी विद्या आळणे व चाईल्ड हेल्प लाईनचे कर्मचारी ऐश्वर्या शेवाळे, दिपाली हिंगोले यांनी पिडीत मुलीच्या घरी गृहभेट देऊन बालिकेचा आई व नातेवाईकांचे समुपदेशन केले. मुलीच्या वयाबाबत खात्री करुन बालविवाह दुष्परीणाम व बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ बाबत सविस्तर माहिती दिली. बालविवाह बेकायदेशीर असल्याचे मुलीच्या पालकाला समजावुन सांगण्यात आले. सदर मुलीला काळजी व संरक्षणाच्यादृष्टीने बालकल्याण समिती नांदेड यांच्या समोर हजर करण्यात आले. यावेळी पालकांकडून बालविवाह न करण्याबाबत हमीपत्र घेण्यात आले

## डॉ. लक्ष्मण उलगडे लिखित 'श्री 108 शिवानंद शिवाचार्य तमलुरेश्वर' महाग्रंथ नोव्हेंबर 2026 मध्ये प्रकाशित होणार

**बीड । प्रतिनिधी**

समस्त भाविक भक्तांसाठी अत्यंत आनंदाची व अभिमानाची बाब म्हणजे आदरणीय गुरुवर्य ष.ब्र.श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महास्वामी तमलुरेश्वर यांच्या दिव्य जीवनकार्यावर आधारित भव्य व सखोल असा महाग्रंथ नोव्हेंबर २०२६ मध्ये प्रकाशित होणार आहे. या महाग्रंथाचे लेखन प्रा. डॉ. लक्ष्मण काशीनाथ उलगडे करत असून, हा ग्रंथ गुरुभक्तांसाठी ज्ञान, प्रेरणा आणि भक्तीचा अमूल्य ठेवा ठरणार आहे.

यापूर्वी फेब्रुवारी २०२१ मध्ये तमलूर येथे राष्ट्रसंत व वसुंधरारत्न डॉ. शिवलिंग शिवाचार्य माऊली



यांच्या शुभहस्ते 'श्रीगुरु दर्शन तमलुरेश्वर : ष. ब्र. १०८ शिवानंद शिवाचार्य महास्वामी' या पहिल्या ग्रंथाचे भव्य प्रकाशन झाले होते. या ग्रंथाचे संपादन श्री माधव काशिनाथ उलगडे व प्रा. डॉ. लक्ष्मण काशीनाथ उलगडे या दोन्ही बंधूंनी केले होते. या ग्रंथास भाविक, अभ्यासक व समाजातील विविध स्तरांतून मोठा प्रतिसाद मिळाला.

या यशस्वी ग्रंथानंतर आता प्रा. डॉ. लक्ष्मण उलगडे यांनी दुसऱ्या, अधिक व्यापक आणि सखोल स्वरूपाच्या महाग्रंथाचे लेखन हाती घेतले आहे. सुमारे ५५१ पानांचा हा ग्रंथ 'माझे गुरु सर्वांचे गुरु : ष.ब्र. श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महास्वामी तमलुरेश्वर' या नावाने प्रकाशित होणार आहे. हा ग्रंथ कार्तिक पौर्णिमा २०२६ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा असून, त्यानंतर नोव्हेंबर २०२६ मध्ये प्रकाशन केले जाणार आहे. दरम्यान, श्री गुरुमाऊलींविषयी मनोगत, अनुभव तसेच महाग्रंथासाठी शुभेच्छा संदेश देऊ इच्छिणाऱ्या भाविकांनी हे संदेश दिनांक १ मार्च २०२६ पर्यंत महाग्रंथाचे लेखक डॉ. लक्ष्मण उलगडे यांच्याकडे व्हॉट्सप क्रमांक ९७६५६३०५९१ वर पाठवावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क श्री प्रभय्या स्वामी, शिवा बन्नालिकर, आकाश गुडपळे, तेजेराव टेकमाळे

## अमृतने घडवला उद्योजकतेचा प्रत्यक्ष अनुभव; केज प्रशिक्षणार्थींची लातूर एमआयडीसी औद्योगिक भेट

**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था असलेल्या अमृतच्या पुढाकारातून आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (चउएऊ) यांच्या सहकार्याने केज येथे सुरू असलेल्या उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षणार्थींसाठी एक प्रेरणादायी व मार्गदर्शक औद्योगिक भेट आयोजित करण्यात आली. हा २१ दिवसांचा उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम २१ नोव्हेंबर ते १६ डिसेंबर या कालावधीत सुरू असून, त्याचाच एक महत्त्वाचा भाग म्हणून सोमवार, दिनांक १५ डिसेंबर रोजी लातूर



एमआयडीसीतील विविध उद्योगांना प्रत्यक्ष भेट देण्यात आली. सदर प्रशिक्षणात एकूण ३८ प्रशिक्षणार्थी सहभागी असून, सर्व प्रशिक्षणार्थींनी या औद्योगिक भेटीत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या औद्योगिक भेटीदरम्यान प्रशिक्षणार्थींना गाईच्या शेणापासून तयार होणारे लाकूड व गौर्या, नारळाच्या संपूर्ण भागापासून तयार होणाऱ्या काथ्या, पायपुसण्या, कोकोपीट व इतर उत्पादने, तसेच गारमेंट उद्योगातील प्रत्यक्ष उत्पादन प्रक्रिया यांचे सखोल व प्रात्यक्षिक ज्ञान मिळाले या भेटीत अमृत बीड जिल्हा उपव्यवस्थापक श्री. दिगंबर जोशी, एमसीईडी बीड प्रकल्प अधिकारी श्री. दत्तात्रय क्षीरसागर, एमसीईडी लातूर प्रकल्प अधिकारी श्री. गायकवाड, तसेच अमृत लातूर जिल्हा व्यवस्थापक श्री. शुभम मुळजकर उपस्थित होते. प्रथम गाईच्या शेणापासून लाकड्या व गौर्या तयार करणाऱ्या उद्योगास भेट देण्यात आली. येथे उद्योगपती श्री. चौधरी यांनी कच्चा माल, वापरण्यात येणारी मशिनरी, उत्पादन प्रक्रिया, खर्च रचना, विक्री व बाजारपेठ याबाबत सविस्तर माहिती दिली.

## नगरपरिषद-नगरपंचायत क्षेत्रातील आठवडी बाजार मतदान व मतमोजणीच्या दिवशी राहतील बंद

**नांदेड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात नगरपरिषद व नगरपंचायत सुधारित सार्वत्रिक निवडणुक-२०२५ च्या अनुषंगाने नगरपरिषद व नगरपंचायत क्षेत्रात मतदानाच्या दिवशी व मतमोजणी दिवशी भरणारे आठवडी बाजार बंद राहणार आहेत. हे सर्व आठवडी बाजार हे सोमवार २२ डिसेंबर २०२५ या रोजी भरविण्यात यावेत, अशा आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी मार्केट अँड फेअर ॲक्ट, १८६२ चे कलम ५ अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन निर्गमीत केला आहे. नांदेड जिल्ह्यातील निवडणुक निर्णय अधिकारी तसेच सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे शनिवार २० डिसेंबर २०२५ रोजी मतदानाच्या दिवशी व रविवार २१ डिसेंबर २०२५ रोजी मतमोजणीच्या दिनांकास आदेशात नमुद केलेल्या नगरपरिषद व नगरपंचायतक्षेत्रात भरणारे आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेशीत केले आहे.

शनिवार २० डिसेंबर रोजी मतदानाच्या दिवशी आठवडी बाजार भरणाऱ्या ठिकाणाची नावे निरंक आहेत. तर रविवार २१ डिसेंबर २०२५ रोजी मतमोजणीच्या दिवशी आठवडी बाजार भरणाऱ्या ठिकाण बिलोली, धर्माबाद, मुदखेड, किनवट या नगरपरिषदेचा यात समावेश आहे. देगलूर, हदगाव, नगरपंचायत हिमायतनगर, कंधार, कुंडलवाडी, मुखेड, उमरी, भोकर, लोहा या नगपरिषद निरंक आहेत. या नगरपरिषद व नगरपंचायत क्षेत्रात भरणारे सर्व आठवडी बाजार हे सोमवार २२ डिसेंबर २०२५ या रोजी भरविण्यात यावेत. हा आदेश ११ डिसेंबर २०२५ रोजी निर्गमीत करण्यात आला आहे.


### जाहिर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (व .स्तर) बीड यांचे न्यायलयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रं. १६१० /२०२५**

अर्जदार:- १) बाबुराव पि.बाजीराव वरपे, वय-७६ वर्षे,धंदा-शेती, रा.कुटेवाडी ता.जि.बीड, २) तुकाराम पि.बाबुराव वरपे, वय-५१ वर्षे, धंदा-शेती, रा. सदर

(अर्जदार हे भारतीय रहिवाशी आहेत)

विरुध्द निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी मयत नामे मुक्ताबाई भ्र.बाबुराव वरपे, रा.कुटेवाडी ता.जि.बीड या दिनांक १५-०७-२०२४ रोजी कुटेवाडी ता.जि.बीड येथे मयत झालेल्या असुन अर्जदार क्रं. १ हे मयताचे पती आहेत.तसेच अर्जदार क्रं. २ हा मयताचा मुलगा आहे.२) हे की,अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक:- ०४/११/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली. पुढील तारीख:- ०६/०१/२०२५

शिक्का | (स्वाक्षरीत) क. लिपीक | आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

### जाहिर प्रगटन

**मा. श्री. रफीक ए. शेख, सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक :- १२६७ / २०२५**

अर्जदार :-१. मंगल प्रभाकर आराक, वय ५५ वर्षे, धंदा घरकाम, रा. विवेकानंद शाळेजवळ, धानोरा रोड, बीड, ता.जि.बीड, २. सुरेंद्र प्रभाकर आराक, वय ४३ वर्षे, धंदा नौकरी, रा. वरीलप्रमाणे, ३. जितेंद्र प्रभाकर आराक, वय ४० वर्षे, धंदा नौकरी, रा. वरीलप्रमाणे, ४. स्नेहल विजेंद्र आराक, वय २९ वर्षे, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे, ५. प्रियंका प्रभाकर आराक ( विवाहापुर्वीचे नाव ) प्रियंका राहुल वानखेडे ( विवाहानंतरचे नाव ). वय ३६ वर्षे, धंदा घरकाम, रा. विवेकानंद शाळेजवळ, धानोरा रोड, बीड, ता.जि.बीड, ह.मु. छत्रपती संभाजीनगर, ता.जि. छत्रपती संभाजीनगर,

विरुरुद निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी मयत नामे राहिबाई जनार्धन आराक हया दिनांक ३०/०४/२०१३ रोजी महात्मा फुले नगर, पिर बाजार, दर्गा रोड, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर ता. जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले असुन अर्जदार क १ ही मयताच्या मयत मुलाची पत्नी म्हणजेच मयताची सुन आहे. अर्जदार क २ व ३ हे मयताचे नातु आहेत. तसेच अर्जदार क ४ ही मयताची नातसुन आहे. अर्जदार क ५ ही मयताची विवाहित नात आहे.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक:- २०/११/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
पुढील तारीख:- १८/१२/२०२५.
( मार्फत विधिज्ञ:- ॲड डी एम रोटे )

शिक्का | (स्वाक्षरीत) क. लिपीक | आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

### जाहिर प्रगटन

**मा. श्रीमती ए. बी. निवारे १० वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज १८६४/२०२५**
**कासाबाई विरूद्ध निरंक**

अर्जदार :- १) कासाबाई अच्युतराव घोरड, वय ७५. धंदा घरकाम रा. ब्रम्हगांव, ता. जि. बीड, २) लक्ष्मण अच्युतराव घोरड, वय ५०, धंदा घरकाम रा. तुळजाई मोटार डायव्हींग स्कुल, जालना रोड ता. जि. बीड, (३) आशालता सुरेशराव जाधव, वय ४६. धंदा घरकाम रा. बाहेगव्हाण ता. जि. बीड (४) उषा प्रल्हाद आहेर, वय ४५, धंदा घरकाम रा. उमरद जहाँगिर, ता. जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत अच्युत रामभाउ घोरड, रा. ब्रम्हगांव, ता. जि.बीड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत अच्युत रामभाउ घोरड, रा. ब्रम्हगांव ता. जि. बीड यांचा मृत्यु दि. ०४/१०/२०२५ रोजी मौज, ता. जि. बीड येथे झाला आहे. अर्जदार क्रमांक १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ मयताचा मुलगा असून अर्जदार क. ३ व ४ ही मयताच्या विवाहीत मुली आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत अच्युत रामभाउ घोरड, रा. ब्रम्हगांव ता. जि. बीड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १६ माहे डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १९ जानेवारी २०२६.

(ॲड. एस. बी. नांदे यांच्यामार्फत)

शिक्का | (स्वाक्षरीत) क. लिपीक | आदेशावरून (स्वाक्षरीत) स.अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● बुधवार, दि. १७ डिसेंबर २०२५ ● पान ४

## थोडक्यात...

### पोलीस पाटील रिक्त पदे आरक्षण सोडतीबाबत निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

परळी वै उपविभागातील पोलीस पाटील पदाची रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने गावनिहाय आरक्षण निश्चितीबाबत जिल्हांदडाधिकारी बीड यांनी दि. १४.१२.२०२५ हे आदेश निर्गमित केलेले आहे. सदर रिक्त पदे भरण्यासंदर्भात पोलीस पाटील रिक्त पदाचे प्रवर्गनिहाय समांतर आरक्षण घोषित करण्यात येणार आहे. जिल्हादंडाधिकारी बीड यांचे दि. १४.१२.२०२५ रोजीच्या परिपत्रकानुसार पोलीस पाटील भरती प्रक्रियेचे अनुषंगाने गावनिहाय आरक्षण निश्चितीबाबत खालील प्रमाणे वेळापत्रक ठरवुन देण्यात आलेले आहे. भरती प्रक्रियेचे टप्पे:– १५ ते २० डिसेंबर २०२५ जाहिर नोटीस प्रसिध्द करणे व गावनिहाय आरक्षण निशित करणे. दि. २२ डिसेंबर २०२५ ते २६ डिसेंबर २०२५ आरक्षणावर अक्षेप. ३० डिसेंबर २०२५ प्राप्त आक्षेपावर निर्णय घेऊन गावनिहाय अंतिम आरक्षण जाहिर करणे वेळापत्रकाच्या अनुषंगाने पोलीस पाटील रिक्त पदे आरक्षणाची सोडत काढून निश्चित करावयाची आहे. त्याकरीता दि. १९ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ०१.०० वाजता मध्यवर्ती प्रशासकीय इमारत तहसील कार्यालय परळी वै येथे सभा आयोजित केलेली आहे. तरी इच्छुक नागरिकांनी आरक्षण सोडत काढण्याकरीता हजर राहावे. आरक्षण निश्चित झाल्यानंतर आक्षेप किंवा हरकत विचारात घेण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी.

### सण उत्सवानिमित्त वाद्य वाजविण्याचे दिवस जाहिर

**बीड । प्रतिनिधी**

उत्सव कालावधीत पंधरा (१५) दिवस सकाळी ०६.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत वाद्य वाजविण्यास परवानगी देण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी ध्वनी प्राधिकरण तथा जिल्हा पोलीस अधिक्षक यांचेशी सल्लामसलत करुन दिवस निश्चित करुन त्याची आगाऊ यादी ०१ जानेवारी किंवा तत्पूर्वी जाहीर करणेबाबत नमूद केले आहे. जिल्हयात ध्वनी प्रदुषण नियंत्रण प्राधिकरण यांचे कार्यालय नसल्याने पोलीस अधिक्षक, बीड यांनी बीड जिल्हयात ०१ जानेवारी २०२६ ते ३१ डिसेंबर २०२६ या कालावधीत सकाळी ६.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत वाद्य वाजविण्याची परवानगी देण्यासाठी १५ दिवस प्रस्तावित केले आहेत. बीड जिल्ह्यात ध्वनी प्रदुषण नियम २००० मधिल नियम ३ व ४ तसेच ध्वनि प्रदुषण (नियंत्रण व नियमन) नियम २००० मधिल अटी व शर्तीस अधिन राहून खालील प्रमाणे नमुद दिवशी ०१ जानेवारी २०२६ ते ३१ डिसेंबर २०२६ या कालावधी दरम्यान सकाळी ०६.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत ध्वनीची मर्यादा राखून वाद्य वाजविण्यास परवानगी देण्यात येत आहे. शिवजंयती १ दिवस, ईद ए मिलाद १ दिवस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती १ दिवस, १ मे महाराष्ट्र दिन १ दिवस, गणपती उत्सव चार दिवस अनंत चतुर्दशीसह शेवटचे तीन दिवस, नवरात्री उत्सव २ दिवस अष्टमी आणि नवमी, दिपावली एक दिवस, लक्ष्मीपुजन, ख्रिसमस एक दिवस, ३१ डिसेंबर १ दिवस, उर्वरित दोन दिवस महत्वाच्या कार्यक्रमासाठी राखीव असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

### ई–पीक पाहणीसाठी समिती गठित

**बीड । प्रतिनिधी**

खरीप हंगाम २०२० मध्ये विहित मुदतीत ई–पीक पाहणी (DCS) नोंद न झालेल्या शेतकऱ्यांच्या पीकाची ऑफलाईन पाहणी करण्यासाठी उप विभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली खालीप्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे. उपविभागीय अधिकारी अध्यक्ष, तहसीलदार सदस्य, गटविकास अधिकारी सदस्य, तालुका कृषी अधिकारी सदस्य असून समितीने खालीलप्रमाणे कार्यवाही विहित मुदतीत पूर्ण करण्यात यावी. फेरचौकशी: ज्या शेतकऱ्यांना काही कारणांमुळे पिकांची नोंद करता आली नाही आणि सदर नोंद ७/१२ उता–यावर आली नाही, त्यांच्याबाबत प्रत्यक्षात पीक असल्याची फेरचौकशी करून अहवाल दिनांक १५ जानेवारी, २०२६ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा. सर्व उप विभागीय अधिकारी (अध्यक्ष) यांनी समितीच्या कामकाजाचा दररोज आढावा घ्यावा आणि दैनिक अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास व पणन विभागास सादर करावा. समितीने करावयाच्या कार्यवाहीबाबतच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या स्तरावरुन लवकरच निर्गमित करण्यात येतील. या अहवालानुसार पणन विभागाने पीक खरेदी करण्याबाबत पुढील आवश्यक कार्यवाही तात्काळ करावी.

### महाराष्ट्र बारव समितीची विविध बारवांची पाहणी

**बीड । प्रतिनिधी**

राज्यस्तरीय महाराष्ट्र बारव समितीचे अशासकीय सदस्य रोहन काळे यांनी बीडला भेट दिली.खंडेश्वरी मंदिर बारव, फुलईनगर येथील कलिंदेश्वर बारव, पापनेश्वर बारव, शनी मंदिर बारव सह शहर व परिसरातील पुरातन बारवांची पहाणी केली. बारव निर्मिती ही तत्कालीन राज्यकर्त्यांची उत्कृष्ट जलनीती होती. होळकरशाहीतील थोर शासनकर्ती पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी बारव निर्मितीचे भारतभर जाळे निर्माण केलेले आहे. काळाच्या ओघात दुर्लक्षामुळे बारवा नामशेष होत चालल्या आहेत. बारवांचे जतन व संवर्धन करणे म्हणजे केवळ जलसाठा टिकवणे नव्हे, तर इतिहास जिवंत ठेवणे होय. हाच विचार घेऊन शासन स्तरावर महाराष्ट्र बारव समिती गठित करण्यात आली आहे. बारव संवर्धनासाठी स्थानिक नागरिकांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. राज्यस्तरीय महाराष्ट्र बारव समितीचे अशासकीय सदस्य रोहन काळे यांनी बीडला भेट दिली. यावेळी त्यांनी खंडेश्वरी मंदिर बारव, फुलईनगर येथील कलिंदेश्वर बारव, पापनेश्वर बारव, शनी मंदिर बारव, पेठ बीड येथील चमन बाग तसेच शिदोड परिसरातील बारवांची प्रत्यक्ष पाहणी केली. या प्रसंगी रोहन काळे यांच्या मार्गदर्शनाखाल महाराष्ट्र बारव मोहीम बीड जिल्हा समन्वयक पदी सचिन लुचारे यांची निवड करण्यात आली.

### बीडमध्ये पोलिसांनी पाठलाग करूनही चोरटे गेले पळून

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील पोलिसांनी एका चारचाकी वाहनाचा पाठलाग केला पण वाहन सोडून चोरटे उसाच्या शेतात पसार झाले. धारूर तेलगाव रस्त्यावर ही घटना घडली. धारूर –तेलगाव रस्त्यावर पेट्रोलिंग करत असताना धारूर पोलिसांना एक संशयास्पद सुमो गाडी आढळून आली. चोरांबा–थेटेगव्हान दरम्यान समोरून येणाऱ्या या गाडीच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने पोलिसांनी काही अंतरापर्यंत पाठलाग सुरू केला. पोलिसांचा पाठलाग लक्षात येताच गाडीतील चोरट्यांनी आपली सुमो रस्त्यालगत उभी करून जवळच असलेल्या उसाच्या शेतात पळ काढला. पोलिसांनी ग्रामस्थांच्या मदतीने परिसरात शोधमोहीम राबवली. मात्र रात्रीची वेळ, अंधार आणि ऊसाची दाट शेती यामुळे चोरट्यांचा शोध घेण्यात पोलिसांना यश आले नाही. पळून गेलेल्या चोरट्यांनी घटनास्थळी सुमो गाडी सोडून दिली.ती तपासली ती चोरीची असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. सदर गाडी पोलिसांनी ताब्यात घेतली असून पुढील तपास सुरू आहे.

---

हजारो तरूणांना व्यसनमुक्त करणारे अमृत काका सारडांवर आरोप करतांना अमर नाईकवाडेंनी दलीतांची लायकी काढली...

# शंभर दिडशे रुपये घेणारे कोण ?

## अमर नाईकवाडे यांचा जातीयवादी चेहरा समोर : निलेश लोंढे,महेश कसबे

**बीड । प्रतिनिधी**

पेठ बीडच्या विकासाचे व्हिजन असलेले अमृत काका सारडा यांनी हजारो युवकांना व्यसनमुक्त केले आहे. अडी–अडचणीला मतदर करणारे काका, गोरगरिबांना मदत करणारे काका मात्र यांच्यावर आरोप करतांना अमर नाईकवाडे यांनी चक्क दलीत समाजाबद्दल अक्षेपहार्य वक्तव्य करून संपूर्ण दलीत समाज बांधवांचा अपमान केला आहे. १०० दिडसे रूपयांत दलीतांची लायकी ठरवणारा अमर नाईकवाडेचा खरा जातीयवादी चेहरा समोर आला आहे. दलीत समाज बाधवांबद्दल केलेल्या वक्तव्यामुळे प्रभाग क्रमांक तीनमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे. समाजातील कष्टकरी, स्वाभिमानी आणि संघर्षशील घटकांना पैशाच्या चौकटीत मोजण्याचा हा अहंकार निषेधार्ह असून १००दिडशे रुपये घेणारे नेमके कोण लोक आहेत? त्यांच्या नावांचा खुलासा अमर नाईकवाडे यांनी करावा. अशी मागणी ईश्वर धन्वे, विष्णू पवार यांनी केली आहे.

**● अमर नाईकवाडे यांनी समाजसेवक अमृत काका सारडा यांच्यावर सातत्याने बिनबुडाचे, तथ्यहीन आणि बदनामीकारक आरोप सोशल मिडियाच्या माध्यमातून केलेले आहेत. अमृत काका यांनी पेठ बीडच्या विकासाबरोबरच हजारो कुटुंबांतील व्यसनाधीन व्यक्तींना स्वत:च्या खर्चातून श्रीक्षेत्र नानिजधाम मठ येथे, जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज यांच्या साक्षीने, व्यसनमुक्त करण्याचे कार्य केले आहे. अमर नाईकवाडे यांच्या सरखे फेसबुकवर घोषणा नाही, तर प्रत्यक्षात पेठ बीड भागात घडलेली सामाजिक क्रांती आहे.**

गरीब व गरजवंत कुटुंबांतील विवाह, दवाखान्यातील रुग्णांना मदत, विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी भरणे, खेळाडूंना प्रोत्साहन देणे, पेठ बीड भागात सुसज्ज तालुका स्टेडियम उभारणे, अग्निशामक दलाची स्थापना करणे आणि परिसराचे सुशोभीकरण ही सर्व कामे अमृत काकांच्या कार्यकर्तृत्वाची साक्ष देतात. कोरोना काळात हजारो कुटुंबांना मदतीचा हात देणारा माणूस म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. अमर नाईकवाडे ▶ उर्वरित पान २ वर

## बीडमध्ये थरार! लग्न समारंभात पाहुणे बनून चोरी करणारी आंतरराज्य 'सिसोदिया गॅंग' गजाआड

**बीड । प्रतिनिधी**



लग्न समारंभात पाहुणे किंवा भिकारी बनून दागिने चोरणे, तसेच अंगावर टोमॅटो सॉस टाकून नागरिकांचे लक्ष विचलित करत पाकीटमारी करणे, अशा आंतरराज्यीय गुन्ह्यांची 'मोडस ऑपरेंडी' (गुन्हा करण्याची पद्धत) असलेल्या टोळीला बीडच्या स्थानिक गुन्हे शाखेने पाठलाग करून अटक केली आहे. मध्यप्रदेशातील या टोळीने बीड, अंबाजोगाई आणि गेवराई परिसरात धुमाकूळ घातला होता.

बादल कृष्णा सिसोदिया (वय २४), काला उर्फ ऋतिक महेश सिसोदिया (वय २९), दीपक दिलीप सिसोदिया (वय २९) आणि जस्वंत मनिलाल सिसोदिया (वय २७) (सर्व रा. गुलखेडी, ता. पाचोर, जि. राजगड, मध्यप्रदेश) अशी पकडलेल्या आरोपींची नावे आहेत. या टोळीतील आरोपींची चोरी करण्याची पद्धत अत्यंत वेगळी होती. ते लग्न समारंभात पाहुण्यांच्या किंवा भिकाऱ्यांच्या वेशात जात दागिने चोरत. तसेच, बँकेतून पैसे काढणाऱ्या लोकांवर पाळत ठेवून त्यांच्या पैशांची बॅग हिसकावणे, तसेच अंगावर टोमॅटो सॉस टाकून नजर हटवून हातातील पैसे घेऊन पळून जाणे, अशा पद्धतीने ते नागरिकांची फसवणूक करत. १२ डिसेंबर रोजी हे चौघे चोरीच्या दुचाकी घेऊन केजमध्ये एका बॅग लुटण्याच्या इराद्याने आले होते, परंतु त्यांचा प्लॅन फसला. ते दोन विना क्रमांकाच्या दुचाकीवरून बीडकडे पळत होते. याच ▶ उर्वरित पान २ वर



*बीड: अखिल भारतीय मराठा महासंघाचे मराठवाडा विभागीय सरचिटणीस मा.विनोद आप्पा इंगोले यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नांदेड येथे प्रयोगशाळा सहाय्यक पदी निवड झाल्याबद्दल मा.अनिकेत घोडके यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या यावेळी प्रा.डॉ. दत्तात्रय काळे उपस्थित होते.*

## कडाक्याच्या थंडीने पिंपळनेर परिसर गारठला तापमान १२ अंश सेल्सिअसच्या खाली

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील पिंपळनेरसह परिसरात कडाक्याची थंडी वाढत चालल्याने जनजीवन विस्कळीत होऊन परिसर गारठला आहे. त्यामुळे सकाळच्या शाळेला जाणाऱ्या लहान चिमुकल्यांना थंडीने कुडकुडत जावे लागत आहे. त्याचप्रमाणे शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांना तसेच रात्रीच्या वेळी पिकांना पाणी देताना थंडीतच शेतकऱ्यांना रात्रभर जागे रहावे लागत आहे. त्यामुळे थंडीने त्रास होऊन जनता हैराण झाली आहे. वाढत्या थंडीमुळे लहान मुलांना, ज्येष्ठांना, वृद्धांना ताप, थंडी, सर्दी, खोकला असे आजार वाढू लागले आहेत. वाढत्या थंडीचा दूध व्यवसायावर अत्यंत प्रतिकूल परिणाम झालेला दिसत आहे. सकाळचे लवकर उठून धारा काढणे, दूध डेअरीपर्यंत पोहोचविणे थंडी मुळे जिकरीचे बनले आहे. थंडी ही काही अंशी गहू, हरभरा व गाजर या पिकाला पोषक असली तरी ज्वारी, केळी,करडई, भाजीपाला, द्राक्ष व फळबागांना हानीकारक, रोगराई पसरविणारी आहे. सध्या सर्वत्र साखर कारखाने चालू झाले ▶ उर्वरित पान २ वर

## ॲड. मंगेश ससाणे यांचेवर हल्ला करणाऱ्या समाज कंटकांना अटक करा

### समता परिषदेची मागणी व सकल ओबीसी समाजाची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



**माजलगाव । प्रतिनिधी**

ॲड. मंगेश ससाणे यांचेवर प्राणघातक हल्ला करणा–या समाज कंटकांना अटक करून कारवाई करावी अशी मागणी सकल ओबीसी समाज माजलगावच्या वतीने शहर पोलिस प्रशानामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे करण्यात आली आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ॲड. मंगेश ससाण पवन करवर ▶ उर्वरित पान २ वर

## पर्यावरण संवर्धनासाठी योग्य जनजागृतीची गरज : प्रा.डॉ. बापूसाहेब भोसले

### जयभवानीत डिजीटल ग्रंथालय आणि पर्यावरण संरक्षण या विषयावर कार्यशाळा संपन्न

**पाटोदा । प्रतिनिधी**



पर्यावरण संवर्धनासाठी योग्य जनजागृतीची गरज आहे!असे प्रतिपादन शिवाजी महाविद्यालय परभणी येथिल पर्यावरणतज्ञ प्रा.डॉ.बापूसाहेब भोसले यांनी केले.ते पाटोदा येथिल जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात ग्रंथालय व वनस्पतीशात्र विभाग आयोजित डिजीटल ग्रंथालय व पर्यावरण संवर्धन या विषायावरील एक दिवशीय कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणुन बोलत होते.पुढे बोलताना ते म्हणाले की आधुनिकीकरणात विकास होत असताना समस्यांना सुरवात झाली आहे.त्यामुळे पर्यावरणाचे अस्तित्वच धोक्यात आले आहे.वातावरण बदलामुळे प्रदुषण समस्या निर्माण झाली आहे.येणाऱ्या काळात पर्यावरणाचे संवर्धन करणे ही आपली सामुहिक जबाबदारी आहे.म्हणुन आपण सर्वांनी पर्यावरण संवर्धनासाठी शिक्षण,संशोधन व डिजीटल ग्रंथालयाच्या माध्यमातुन योग्य जनजागृतीची गरज निर्माण झाली आहे.या कार्यशाळेचे उद्घाटक म्हणुन श्री.शिवाजीराव पंडित महाविद्यालय,गढीचे प्राचार्य डॉ.विश्वास कदम हे होते.तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे हे होते.तर व्यासपीठावर समन्वयक प्राचार्य डॉ.सुनिल जाधव,प्रा.सोमनाथ घाडगे, अंर्तगत ▶ उर्वरित पान २ वर

## भरधाव वाहनाची धडक अन् आई–वडिलांचा एकुलता एक लेक गेला

**बीड । प्रतिनिधी**



धुळे–सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या मांजरसुंबा घाटात सोमवारी रात्री एका भीषण अपघाताची घटना घडली. एका भरधाव अज्ञात वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने हा भीषण अपघात घडला. या अपघातात २५ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे परिसरातून एकच हळहळ व्यक्त केली जात आहे. अपघातग्रस्त तरुण आपल्या कुटुंबातील एकुलता एक मुलगा असल्याची माहिती समोर आली आहे. चैतन्य व्यंकटेश तांबोळकर (वय २५, राहणार पाचपिंपळा, तालुका परंडा, जिल्हा धाराशिव) हा तरुण सोमवारी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास आपल्या दुचाकीवरून (क्रमांक : एमएच २५ एवाय ७०७५) बीडहून ▶ उर्वरित पान २ वर

## प्रशासकीय अभ्यासातून ग्रामीण विकासाचे चित्र स्पष्टः ढेकणमोहा ग्रामपंचायतीवर विशेष अहवाल

### दिव्यांग प्रशिक्षणार्थी श्री.रविंद्र दिलीप कानाडे यांनी सात दिवसांत केला लोकसंख्याशास्त्रापासून कृषी स्थितीपर्यंत सखोल अभ्यास

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा प्रशासनाच्या एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत तुकडी ११ मधील प्रशिक्षणार्थी, श्री.रविंद्र दिलीप कानाडे (सहा. संचालक, लेखा व वित्त), यांनी दिनांक ०७ ते १३ डिसेंबर २०२५ या कालावधीत बीड तालुक्यातील ढेकणमोहा ग्रामपंचायतीत आपला ग्रामीण संलग्नता प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला आहे. या सात दिवसांच्या अभ्यास दौऱ्यात, श्री. रविंद्र दिलीप कानाडे यांनी केवळ ग्रामपंचायतीच्या कामकाजाचे निरीक्षण केले नाही, तर गावाच्या लोकसंख्याशास्त्रापासून ते आरोग्य, शिक्षण, शेती आणि लोकांचे जीवनमान यांसारख्या आठ महत्त्वाच्या घटकांचा सखोल अभ्यास करून एक महत्त्वाचा अहवाल तयार केला आहे. अभ्यासातील मुख्य निरीक्षणे: श्री. रविंद्र दिलीप कानाडे यांनी आपल्या अहवालात ढेकणमोहा गावातील वस्तुस्थिती आणि विकासाची गरज स्पष्ट केली आहे. पायाभूत सुविधा आणि आरोग्य: गावामध्ये रस्ते आणि वीजपुरवठा समाधानकारक असला तरी, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, सांडपाणी व्यवस्थापन आणि आरोग्य उपकेंद्रातील कर्मचाऱ्यांची नियमित उपस्थिती हे मोठे आव्हान आहे. शिक्षण आणि कौशल्य: गावात शिक्षणाचे प्रमाण चांगले असले तरी, तरुणांना स्थानिक स्तरावर कौशल्य आधारित प्रशिक्षण मिळत नसल्याने उच्च शिक्षणानंतरही बेरोजगारीची समस्या दिसून येते. शेतीची स्थिती: ढेकणमोहा येथील शेती अजूनही बऱ्याच अंशी पावसावर अवलंबून आहे. आधुनिक सिंचन पद्धतीचा अभाव आणि कृषी उत्पन्न बाजार समितीपर्यंत मालाची वाहतूक हे शेतकरी बांधवांसाठी मुख्य अडथळे आहेत. जीवनमान आणि योजना: अनेक कुटुंबे दारिद्र्य रेषेखालील असून त्यांना मनरेगा आणि अन्न सुरक्षा योजनांचा पुरेसा लाभ मिळत नसल्याचे निरीक्षण नोंदवले गेले आहे. दिव्यांग प्रशिक्षणार्थीचा नवा आदर्श: विशेष बाब म्हणजे, श्री रविंद्र दिलीप कानाडे हे दिव्यांग असूनही त्यांनी प्रशासकीय अडथळ्यांवर मात करत, प्रशासनाने दिलेल्या विशेष ▶ उर्वरित पान २ वर